# विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांची संयुक्त बैठक

राज्यपालांचे अभिभाषण सकाळी ११.०० वाजता सुरु होणार आहे. अभिभाषण संपल्यानंतर २० मिनिटांची विश्रांती राहील. त्यानंतर विधानसभेच्या दिवसाच्या कामकाजाचा क्रम पुढीलप्रमाणे राहील :-

## महाराष्ट्र विधानसभा

**दिवसाच्या कामकाजाचा क्रम**
**सोमवार, दिनांक ११ मार्च, २०१३**

**शुभारंभ** : वंदे मातरम्.

**एक** : राज्यपालांच्या अभिभाषणाची प्रत सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

**दोन** : राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव.

तीन : **पुढील अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात येतील :-**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **(१)** | **उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री** | : | (क) | सन २०१३ चा अध्यादेश क्रमांक १ - महाराष्ट्र आकस्मिकता निधी (सुधारणा) अध्यादेश, २०१३ सभागृहासमोर ठेवतील. |
| | | | (ख) | सन २०१३ चा अध्यादेश क्रमांक ५ - महाराष्ट्र मूल्यवर्धित कर (सुधारणा) अध्यादेश, २०१३ सभागृहासमोर ठेवतील. |
| **(२)** | **सहकार मंत्री** | : | | सन २०१३ चा अध्यादेश क्रमांक २ - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) अध्यादेश, २०१३ सभागृहासमोर ठेवतील. |
| **(३)** | **महसूल मंत्री** | : | | सन २०१३ चा अध्यादेश क्रमांक ४ - महाराष्ट्र करमणूक शुल्क (सुधारणा) अध्यादेश, २०१३ सभागृहासमोर ठेवतील. |
| **(४)** | **शालेय शिक्षण मंत्री** | : | | सन २०१३ चा अध्यादेश क्रमांक ३ - महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) (सुधारणा) अध्यादेश, २०१३ सभागृहासमोर ठेवतील. |

**चार** : सन २०१२-२०१३ च्या पुरवणी मागण्या सादर करणे.

**पाच** : दोन्ही सभागृहांनी संमत केलेल्या विधेयकांना राज्यपालांची अधिसंमती मिळाल्याचे जाहीर करण्यात येईल.

**सहा** : अध्यक्ष, सभाध्यक्षांची तालिका नामनिर्देशित करतील.

**सात** : **शोक प्रस्ताव -**

श्री.दत्ताजी शंकर नलावडे, माजी अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, श्री.निलेश शिवराम देशमुख-पारवेकर, वि.स.स., सर्वश्री मल्लिनाथ गुंडानाथ महाराज, वसंतराव राजाराम राऊत, विठ्ठलराव रामचंद्र पवार, दौलतराव हुसनजी गणवीर, माजी वि.स.स. यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक प्रस्ताव.

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : ८ मार्च, २०१३.

**डॉ. अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.